स्थायी समितीच्या शुक्रवार दिनांक 09–06–2017 रोजी दुपारी 03–00 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. संदिप चंद्रभान जाधव | सभापती |
| 2. | श्रीमती संगीता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| 3. | श्रीमती रिता अशोक मुळे | सदस्या |
| 4. | श्रीमती उषा टॉबी पॅलट | सदस्या |
| 5. | श्रीमती दुर्गा चंद्रभुषण हत्तीठेले | सदस्या |
| 6. | श्रीमती नेहा नरेन्द्र वाघमारे | सदस्या |
| 7. | श्रीमती सरला कमलेश नायक | सदस्या |
| 8. | श्रीमती मनिषा सुनिल कोठे | सदस्या |
| 9. | श्रीमती सरिता ईश्वर कावरे | सदस्या |
| 10. | श्रीमती लता सुनिल काडगाये | सदस्या |
| 11. | श्रीमती जयश्री मोहन वाडीभस्मे | सदस्या |
| 12. | श्री. जितेन्द्र भास्कर घोडेस्वार | सदस्य |
| 13. | श्री. हरीश मोहन ग्वालबंशी | सदस्य |
| 14. | श्रीमती अंसारी सय्यदा बेगम मो.निजामुद्दीन | सदस्या |
| 15. | श्री. मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्रीमती भाग्यश्री गणेश कानतोडे | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. रामनाथ सोनवणे, अति. आयुक्त
2. श्री. रविन्द्र कुंभारे, अति. आयुक्त
3. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 63ः– {नगररचना}

मौजा – चिंचभुवन व मौजा – हुडकेश्वर (बु.), नरसाळा येथे नगर रचना परियोजना तयार करण्याकरीता एकुण आठ (8) संस्थेची पात्रता सुची (Empanellment) करण्यास मा. आयुक्त महोदय यांनी दि. 07.12.2016 रोजी मंजुरी प्रदान केलेली असून या क्षेत्राकरीता नगर रचना परियोजना (T.P.Scheme) तयार करणेस्तव पात्रता सुचितील संस्थांकडून मोबदला शुल्क आकारण्याबाबत प्रस्ताव मागविण्यात आलेले होते. निवड

सुचीमधील सर्व संस्थांकडून मोबदला शुल्क आकारणीबाबतचे प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत प्राप्त प्रस्तावांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला असून नस्तीत संलग्न आहे.

तुर्तास मौजा – हुडकेश्वर (बु.) व नरसाळा या क्षेत्राकरीता नगर रचना परियोजना (T.P.Scheme) तयार करण्याचे प्रस्तावित असून, तुलनात्मक तक्त्यानुसार Designe Point Consult Pvt. Ltd. 607-610, 'B' wing Tirupati Plaza Athgate, Surat, Ahmadabad यांनी खालीलप्रमाणे निम्नतम मोबदला शुल्काचा प्रस्ताव दिलेला आहे.

मौजा – हुडकेश्वर (बु.) क्षेत्र – 313.46 हे.आर. करीता रू. 5500/– प्रति हे.आर. प्रमाणे एकुण रू. 17,24,030/– आणि मौजा – नरसाळा क्षेत्र – 297.61 हे.आर. करीता रू. 5,900/– प्रति हे.आर. प्रमाणे एकुण रू. 17,55,899/– याप्रमाणे एकुण रू. 34,79,929/– या व्यतिरीक्त देय असलेला सेवा कर याप्रमाणे मोबदला शुल्क संबंधीत संस्थेने आकारलेले आहे.

मौजा – हुडकेश्वर (बु.) व नरसाळा या क्षेत्राकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 26 अंतर्गत प्रारूप विकास योजना प्रसिध्द् करण्यात आलेली असून, उक्त नकाशात दर्शविल्याप्रमाणे क्षेत्र 611.07 हे.आर. करीता नगर रचना परियोजना तयार करणेस्तव एकुण रू. 34,79,929/– या व्यतिरीक्त देय असलेला सेवा कर याप्रमाणे Design Point Consult Pvt. Ltd. यांना मोबदला शुल्क देणेस्तव मा. स्थायी समितीची मंजुरी देण्याचा प्रश्न विचारात घेऊन ठराव क्र. 08, दि. 24.03.2017 अन्वये मौजा – चिंचभुवन हा स्मार्ट सिटीमध्ये समाविष्ठ करण्यात आला आहे का ? हि बाब प्रशासनाने तपासावी तसेच मौजा – हुडकेश्वर (बु.) नरसाळा यांच्या विकास आराखडयांत पुर्वी नियुक्त करण्यात आलेल्या निवीदा काराने नगर रचना परियोजना काही प्रमाणात समाविष्ठ केल्या आहे का ? या बाबतची तपासणी करून योग्य प्रस्ताव स्थायी समितीकडे परत सादर करावा असे आदेश आहे.

त्यानुसार खालीलप्रमाणे माहिती व प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

1) मौजा – चिंचभुवन हे क्षेत्र स्मार्ट सिटी अभियानमधे अद्याप समाविष्ठ करण्यात आलेले नाही.
2) मौजा – हुडकेश्वर (बु.) नरसाळा यांच्या विकास आराखडयांत पुर्वी नियुक्त करण्यात आलेल्या निवीदेमधे नगर रचना परियोजना समाविष्ठ करण्यात आलेली नाही.

मे. मोनार्च सर्व्हेअर ॲन्ड इंजिनिअरींग प्रा.लि. यांचे दि. 08.03.2017 चे अर्जात नमुद प्रमाणे मौजा–हुडकेश्वर (बु.) व नरसाळा या क्षेत्राकरीता रू. 5,260/– प्रति हे.आर. व या व्यतिरीक्त देय असलेला सेवा कर याप्रमाणे मोबदला शुल्काचा प्रस्ताव कळविलेला आहे. तथापि सदर प्रस्ताव हा विहीत मुदती नंतर विभागास प्राप्त झालेला आहे.

मौजा – हुडकेश्वर (बु.) व नरसाळा या क्षेत्राकरीता नगर रचना परियोजना (T.P.Scheme) तयार करण्याचे प्रस्तावित असून, तुलनात्मक तक्त्यानुसार Designe Point

Consult Pvt. Ltd. 607-610, 'B' wing Tirupati Plaza Athgate, Surat, Ahmadabad यांनी खालीलप्रमाणे निम्नतम मोबदला शुल्काचा प्रस्ताव दिलेला आहे.

मौजा – हुडकेश्वर (बु.) क्षेत्र – 313.46 हे.आर. करीता रू. 5500/– प्रति हे.आर. प्रमाणे एकुण रू. 17,24,030/– आणि मौजा – नरसाळा क्षेत्र – 297.61 हे.आर. करीता रू. 5,900/– प्रति हे.आर. प्रमाणे एकुण रू. 17,55,899/– याप्रमाणे एकुण रू. 34,79,929/– या व्यतिरीक्त देय असलेला सेवा कर याप्रमाणे मोबदला शुल्क Design Point Consult Pvt. Ltd., Ahmadabad या संस्थेने आकारलेले आहे.

मौजा – हुडकेश्वर (बु.) व नरसाळा या क्षेत्राकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 26 अंतर्गत प्रारूप विकास योजना प्रसिध्द् करण्यात आलेली असून, उक्त नकाशात दर्शविल्याप्रमाणे क्षेत्र 611.07 हे.आर. करीता नगर रचना परियोजना तयार करणेस्तव एकुण रू. 34,79,929/– या व्यतिरीक्त देय असलेला सेवा कर याप्रमाणे Design Point Consult Pvt. Ltd. यांना मोबदला शुल्क देणेस्तव मा. स्थायी समितीची मंजुरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमच्या प्रकरण (5) संविदा मधील 2(2) प्रमाणे मे. मोनार्च सर्व्हेअर ॲन्ड इंजिनिअरिंग प्रा.लि. यांचे दर रु. 5260/– हे निम्नतम असल्यामुळे व त्यामुळे म.न.पा.च्या खर्चात बचत होत असल्यामुळे यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 64ः– नागपूर उत्तर मतदार क्षेत्रातील कळमना येथे गुलशन नगर {लोककर्म झोन 09} रेल्वेलाईन ते राम मंदीर रस्त्याचे सिंमेट कॉक्रीटीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. हितेश कंस्ट्रक्शन यांची मुळ प्राकलनीय राशी रु. 1,49,99,991/– पेक्षा 11.06 टक्के कमी दराची रू. 1,33,40,992/–(रूपये एक कोटी तेहत्तीस लक्ष चाळीस हजार नऊशे ब्यान्नंव) ची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न तसेच हे काम शासकीय अनुदान (महानगरपालिका क्षेत्रात प्राथमिक सुखसोयींच्या विकासासाठी विशेष तरतूद) अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च प्रावधान राशी सीमित ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 65ः– नागपूर उत्तर मतदार क्षेत्रातील नारा येथे कस्तुरबा नगर व {लोककर्म झोन 09} मार्टिन नगर येथे नाल्याचे बांधकाम करण्याचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. हितेश कंस्ट्रक्शन यांची मुळ प्राकलनीय राशी रु. 1,21,99,566/– पेक्षा 10,25 टक्के कमी दराची रू. 1,09,49,111/–(रूपये एक कोटी नऊ लक्ष एकोनपन्नास हजार एकशे अकरा) ची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न तसेच, हे काम शासकीय अनुदान (महानगरपालिका क्षेत्रात प्राथमिक सुखसोयींच्या विकासासाठी विशेष तरतूद) अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च प्रावधान राशी सीमित ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 66ः– नागपूर उत्तर मतदार क्षेत्रातील, नारी येथे कामगार नगर ते {लोककर्म झोन 09} कामठी रस्त्याचे सिंमेट कॉक्रीटीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. हितेश कंस्ट्रक्शन यांची मुळ प्राकलनीय राशी रु. 1,49,99,987/– पेक्षा 13.21 टक्के कमी दराची रू. 1,30,18,338/–(रूपये एक कोटी तीस लक्ष अठरा हजार तिनशे

अड्तीस) ची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न तसेच हे काम शासकीय अनुदान (महानगरपालिका क्षेत्रात प्राथमिक सुखसोयींच्या विकासासाठी विशेष तरतूद) अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च प्रावधान राशी सीमित ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 67:– नागपूर उत्तर मतदार क्षेत्रातील नारा येथे, साई मंदीर ते {लोककर्म झोन 09} जरीपटका पोलीस स्टेशन रस्त्याचे सिमेंट कॉक्रीटीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. हितेश कंस्ट्रक्शन यांची मुळ प्राकलनीय राशी रु. 99,99,982/– पेक्षा 14.10 टक्के कमी दराची रू. 85,89,985/–(रूपये पंच्चयान्शी लक्ष एकोणन्नव्वद हजार नऊशे पंच्चयान्शी) ची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न तसेच हे काम शासकीय अनुदान (महानगरपालिका क्षेत्रात प्राथमिक सुखसोयींच्या विकासासाठी विशेष तरतूद) अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च प्रावधान राशी सीमित ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 68:– महानगरपलिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांचा विकास योजने {लोककर्म झोन 04} अंतर्गत प्रभाग क्र. 25 ब, पश्चिम नागपूर विधानसभा क्षेत्रातील भरतनगर भागात रस्त्यांचेकडेने पेव्हींग ब्लॉक लावण्याच्या काम करण्याच्या कामास्तव एकुण 07 अर्हता प्राप्त निविदांपैकी में. जानवी ईटरप्राईजेस हयांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 15.60 टक्के कमी रूपये 26,65,560/– ( रूपये सव्वीस लक्ष पासष्ट हजार पाचशे साठ रूपये फक्त ) स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 69:– {शिक्षण विभाग} ***शैक्षणिक सत्र २०१७-१८ मध्ये नागपूर महानगरपालिकेच्या शाळांतील इयत्ता बालवाडी ते ८ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना गणवेष खरेदीबाबत थेट लाभ हस्तांतरण (DBT) प्रक्रियेचा अवलंब करण्यास्तव पुढील प्रमाणे प्रक्रिया राबविणे आवश्यक आहे.यास्तव,***

*1. पात्र लाभार्थ्यांची यादी तयार करुन त्यांच्या आधार क्रमांकाशी जोडणी (Seeding) करणे.*

*2. निवड केलेल्या पात्र लाभार्थ्यांच्या प्रकरणाला मान्यता देवून त्यांना लेखी कळविणे.*

*3. लाभार्थ्यांनी परिमाणाप्रमाणे (Specification) वस्तूंची खरेदी करणे.*

*4. संबंधित यंत्रणेने लाभार्थ्याने खरेदी केलेल्या वस्तूची व सादर केलेल्या पावतीची शहनिशा करुन पुर्णपणे खातरजमा झाल्यावर लाभार्थ्याच्या बँक खात्यावर योजने अंतर्गत सुनिश्चित केलेल्या अनुदानाची रक्कम जमा करणे.*

*5. लाभार्थ्यांना रोख रक्कमेच्या स्वरुपात अनुदान त्यांच्या आधार क्रमांकाशी निगडीत बँक खात्यात जमा करण्यात यावे.*

***अशी मार्गदर्शक तत्वे देण्यात आलेली आहेत.***

***दि.27.04.17 ला संपन्न झालेल्या शिक्षण विशेष समितीच्या आढावा बैठकीत विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या मोफत गणावेषाबाबत चर्चा करण्यात आली. शिक्षण विशेष समितीच्या बैठकीत झालेल्या चर्चेचा वृत्तांत व याअनुषंगाने घेतलेले निर्णय खालीलप्रमाणे-***

***“आगामी शैक्षणिक सत्रापासून विद्यार्थ्यांना स्वत: गणवेश खरेदी करुन त्याचे देयक सादर केल्यानंतर त्यांचे खात्यात शासनातर्फे अनुदान जमा करण्यात येणार आहे. याचे पुर्वतयारीच्या दृष्टीने मा.सभापती यांनी झोननिहाय शाळा निरीक्षकांकडून शाळांव्दारा विद्यार्थ्यांच्या काढण्यात आलेल्या बँक खाते व आधार कार्ड, याबाबतची माहिती तसेच येणाऱ्या अडचणींबाबत आढावा घेतला. यासोबतच शासनाकडून इ. १ ते ८ मधील सर्व मुली, अनुसूचित जाती जमातीतील मुले, दारिद्य रेषेखालील मुले यांचेकरीता प्रती २ जोडी गणवेश करीता रु.४००/- याप्रमाणे निधी प्राप्त होतो. तरीसुध्दा वस्तुस्थितीत ही रक्कम अपूरी असल्यामुळे शासन जरी रु.४००/- दोन गणवेशाकरीता देत असले, तरी गणवेशाकरीता अतिरिक्त रु.२००/- प्रति विद्यार्थी याप्रमाणे देण्यात यावे. याव्यतिरिक्त असलेले इयता 1 ते 8 मधील मुक्त संवर्ग/ इतर विद्यार्थ्यांना, व इयत्ता 9 ते 12 , बालवाडी (नर्सरी ते KG-II व बालवाडी ) मधील मुले-मुली गणवेशाकरीता***

*निधी प्राप्त होत नाही, अशा सर्व विद्यार्थ्यांकरीता मनपा तर्फे रु. 600/- (दोन गणवेषाकरीता) राशी उपलब्ध करुन देण्याच्या या सुचना मा.सत्तापक्षनेता यांनी करुन यास समितीने एकमताने मंजुरी प्रदाण केली. यास लागणाऱ्या अतिरिक्त राशीचे प्रावधान करण्यास्तव तात्काळ स्थायी समितीस प्रस्ताव देण्याबाबत देखील शिक्षणाधिकारी यांना निर्देशित करण्यात आले.” शिक्षण विशेष समितीच्या बैठकीचे इतिवृत्त सोबत संलग्न.*

*शिक्षण विशेष समितीत झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे गुणांकन तक्ता सादर करण्यात येतो.*

| अ.क्र. | तपशिल | लाभार्थी | दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | बालवाडीचे विद्यार्थी | 2000 | 600 | 12,00,000 |
| 2 | इ.1 ते 8 मधील गणवेश अनुदानाकरीता शासनाकडून अपात्र मुले (मुक्त/इतर संवर्ग) | 6892 | 600 | 41,35,200 |
| 3 | इ.1ते8 मधील गणवेश अनुदान प्राप्त सर्व मुली | 9127 | 200 | 18,25,400 |
| 4 | इ.1ते8 मधील गणवेश अनुदान प्राप्त SC प्रवर्गातील मुले | 1314 | 200 | 2,62,800 |
| 5 | इ.1ते8 मधील गणवेश अनुदान प्राप्त ST प्रवर्गातील मुले | 584 | 200 | 1,16,800 |
| 6 | इ.1ते8 मधील गणवेश अनुदान प्राप्त BPL प्रवर्गातील मुले | 315 | 200 | 63,000 |
| | एकुण | | | 76,03,200 |

*उपरोक्त तक्त्याचे अवलोकन केले असता निदर्शनास येते की, इयत्ता बालवाडी ते 8 वी मधील सर्व विद्यार्थ्यांना गणवेश द्यावयाचा असल्यास शासन निधी (सर्व शिक्षा अभियान) व्यतिरिक्त रु. 76,03,200/- इतक्या निधीची आवश्यकता राहील. हा खर्च विद्यार्थ्यांचा गणवेश पद क्रA25002020705 मधून करण्यात येईल*

***शिक्षण समितीने निश्चित केलेले १) प्रति विद्यार्थी दर रु. 600/- (2 गणवेष) – पूर्णत: म.न.पा. तर्फे द्यावयाच्या (बालवडी, मुक्त/इतर संवर्ग मुले) 2) प्रति विद्यार्थी अतिरिक्त म.न.पा. राशी रु. 200/- - इ.1ते8 मधील गणवेश अनुदान प्राप्त सर्व मुली,मुले(अजा,अज,BPL) दरास व या दराप्रमाणे इयत्ता बालवाडी ते 8 वी च्या विद्यार्थ्यांच्या गणवेषास्तव वर्ग करावयाच्या एकूण रु.76,03,200/- च्या खर्चास मान्यता प्रदान करण्याचा*** प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 70:– {शिक्षण विभाग} ***नागपूर महनगरपालिकेच्या माध्यमिक शाळांतील इयत्ता ९ वी ते १२ व्वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना पाठयपुस्तके पुरविण्यास्तव शाळांकडून प्राप्त मागणीपत्रकाच्या आधारे संकलन करुन “बालभारती , नागपूर” यांचेकडून खालील तपशीलाप्रमाणे पुस्तक खरेदी करणे आवश्यक आहे.***

***१) इयत्ता ९वी – रु. १३,२३,७६४/-***
***२) इयत्ता १० वी – रु. १२,९०,०४२/-***
***३) इयत्ता ११ वी – रु. २,०९,६२५/-***
***४) इयत्ता २ वी – रु. २,१५,३६६/-***

***एकूण – रु.३०,३८,७९७/-***

***बालभारतीकडून खरेदी करावयाची पुस्तके शासनाकडून निर्धारित केलेल्या दरानुसार खरेदी केल्या जातात. इयत्ता ९ वी चा अभ्यासक्रम यावर्षी बदललेला असून बालभारतीकडे शासनाद्वारा निर्धारित किंमत उपलब्ध नाही. सद्यस्थितीत जे दर उपलब्ध आहेत त्याआधारे गुणांकन केले आहेत.***

***सबब सद्यस्थितीत प्राप्त मगणीपत्रांचे आधारे निश्चित पुस्तकांच्या संख्येप्रमाणे “बालभारती” येथे मागणी नोंदविण्यस्तव व यासोबत द्यावयाचा रु. ३०,३८,७९७/- (दरामध्ये***

***फरक पडल्यास त्याप्रमाणे निश्चिती करुन) चा खर्च मंजुर करण्यास्तव*** प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 71:— ***शैक्षणिक सत्र २०१७-१८ मध्ये नागपूर महानगरपालिकेच्या***
{शिक्षण विभाग} ***माध्यमिक शाळांतील इयत्ता ९ वी ते १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना गणवेष खरेदीबाबत थेट लाभ हस्तांतरण (DBT) प्रक्रियेचा अवलंब करण्यास्तव पुढील प्रमाणे प्रक्रिया राबविणे आवश्यक आहे.यास्तव,***

1. ***पात्र लाभार्थ्यांची यादी तयार करुन त्यांच्या आधार क्रमांकाशी जोडणी (Seeding) करणे.***
2. ***निवड केलेल्या पात्र लाभार्थ्यांच्या प्रकरणाला मान्यता देवून त्यांना लेखी कळविणे.***
3. ***लाभार्थ्यांनी परिमाणाप्रमाणे (Specification) वस्तूंची खरेदी करणे.***
4. ***संबंधित यंत्रणेने लाभार्थ्याने खरेदी केलेल्या वस्तूची व सादर केलेल्या पावतीची शहनिशा करुन पुर्णपणे खातरजमा झाल्यावर लाभार्थ्याच्या बँक खात्यावर योजने अंतर्गत सुनिश्चित केलेल्या अनुदानाची रक्कम जमा करणे.***
5. ***लाभार्थ्यांना रोख रक्कमेच्या स्वरुपात अनुदान त्यांच्या आधार क्रमांकाशी निगडीत बँक खात्यात जमा करण्यात यावे.***

***अशी मार्गदर्शक तत्वे देण्यात आलेली आहेत.***

***शैक्षणिक सत्र 2017-18 मध्ये थेट लाभ हस्तांतरण (DBT) प्रक्रीया राबवावयाची असल्यामुळे एकुण 28 माध्यमिकशाळांच्याविद्यार्थीपटसंख्येनुसारवशाळांच्यामागणीप्रमाणे दोन जोडी गणवेशांचा निधी माध्यमिक शाळांच्या शाळा समितीच्या खात्यावर जमा करणे संयुक्तीकवाटते***

मनपाच्या एकूण 28 माध्यमिक व 4 कनिष्ठ महाविद्यालयात इयत्ता 9 वी ते 12 वी करिता एकूण 5588 विद्यार्थ्यांच्या गणवेषाची मागणी असून यापैकी मुले 2862 व मुली 2722 इतक्या आहेत.

***दि.२७.०४.२०१७ ला संपन्न झालेल्या शिक्षण समितीच्या बैठकीत प्रती विद्यार्थी प्रती गणवेश रु.३००/-, २ जोडी करीता रु.६००/- असा दर निश्चित करण्यात आलेला आहे. याअनुषंगाने शैक्षणिक सत्र २०१७-१८ करीता*** इयत्ता 9 वी ते 12 वीच्या विद्यार्थ्यांना गणवेष पुरविण्यास्तव पुढीलप्रमाणे खर्च अपेक्षित राहील. अ) मुले — रू. 1717200/— व मुली — 1633200/— अशाप्रकारे एकंदर रू. 3352800/— खर्च अपेक्षित आहे.

***शिक्षण समितीने निश्चित केलेले प्रति विद्यार्थी दर रु. 600/- (2 गणवेष) या दरास व या दराप्रमाणे इयत्ता 9 वी ते 12 च्या शाळांना विद्यार्थी पटसंख्येप्रमाणे वर्ग करावयाच्या एकूण रु.33,52,800/- च्या खर्चास मान्यता प्रदान करण्याचा*** प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 72:— प्रभाग क्र. ६१ अंतर्गत मौजा दिघोरी येथील विविध
{लोककर्म झोन 05} अभिन्यासातील मलवाहीकेचे काम करण्यास्तव एकूण प्राप्त पाच अर्हताप्राप्त निविदांपैकी मे. विनोद मोहन मडावी यांची प्रशासकीय दरापेक्षा १० टक्के कमी दराची प्रथम निमित्तम निविदा राशी रू. ३३,६१,७६९/— रकमेची निविदा मंजूर करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 73:— नागपूर महानगरपालिका परिवहन विभागातर्फे शहरबस
{परिवहन विभाग} परिवहन सेवा GCC (Gross Cost Contract) तत्वावर सुरू करण्यात आली असून महानगरपालिका अधिनियमातील कलम ९७ व ९८ अन्वये परिवहन विभागाचे स्वतंत्र अर्थसंकल्प 'ब' तयार करण्याबाबतचे तरतुदीनुसार सन २०१६—१७ चे चार महिन्याचे सुधारीत अंदाजपत्रक व सन २०१७—१८ चे वार्षिक

अंदाजपत्रक प्रथमत: तयार करण्यात आलेले असून त्यास परिवहन समिती ठराव क्र. ०३, दि. ०३/०६/२०१७ रोजी मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

परिवहन व्यवस्थापक यांनी महानगरपालिका अधिनियम ९८ (१) सादर करण्यात आलेला अर्थसंकल्प 'ब' मध्ये फेरफार व बदल करण्याचे अधिकार सभापती, परिवहन समिती यांना एकमताने प्रदान केले आहे. या अधिकारान्वये त्यांनी केलेल्या आवश्यक त्या फेरबदलासह सुधारीत अर्थसंकल्प 'ब' कलम ९८ (३) प्रमाणे स्थायी समितीच्या अभिप्राय व शिफारशीसह मनपा सभागृहाकडे पाठविण्यास्तव सादर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन परिवहन समिती, सभापती यांनी सादर केलेला सन २०१७–२०१८ चे प्रस्तावित अर्थसंकल्प ''ब'' महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ९८ (३) अन्वये आवश्यक त्या अभिप्राय व शिफारसीसह म.न.पा. सभागृहाकडे अर्थसंकल्पीय अंदाजाच्या अंतिम स्विकृतीसाठी सादर करण्याचे अधिकार अध्यक्ष स्थायी समिती यांना प्रदान करण्यास ही स्थायी समिती एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 74 :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

| | |
|---|---|
| निगम सचिव<br>महानगरपालिका,नागपूर | सभापती<br>स्थायी समिती,<br>महानगरपालिका,नागपूर |